# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

विषय : तात्पुरत्या स्वरूपात (Adhoc) नियुक्त केलेल्या उमेदवारांच्या शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करीता (Continuation) मान्यता बाबत...

१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थेतील अध्यापकांना विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक असते. संबंधित महाविद्यालये/परिसंस्था विहित प्रक्रियेद्वारे निवड झालेल्या उमेदवारांना कायमस्वरूपी/स्थानिक/तासिका तत्वावर मान्यता घेण्यासाठी विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असते.

२) यासंदर्भात प्राप्त आदेशानुसार असे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये शिक्षक मान्यता प्राप्त शिक्षकांची मान्यता महाविद्यालयाच्या विनंती नुसार शैक्षणिक वर्ष २०२१–२२ या कालावधीत अथवा विहित प्रक्रियेद्वारे नियमित पद भरती हाईपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत मुदतवाढ (Continuation) देण्याचा निर्णय कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर विशेष बाब म्हणून घेण्यात आलेला आहे.

३) ज्या पात्र शिक्षकांनी शैक्षणिक व इतर अर्हता पूर्ण केलेली आहे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२०–२१ मध्ये शिक्षक मान्यता प्राप्त केलेली आहे, फक्त अशाच मान्यता प्राप्त शिक्षकांना शैक्षणिक वर्ष २०२१–२२ या एका शैक्षणिक वर्षाकरीता (Continuation) मान्यता घेण्यासाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करावी.

अ) संस्थेच्या सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षाकरीता शिक्षक मान्यतेची मुदतवाढ घेण्यासाठी केलेला ठराव.
ब) शैक्षणिक वर्ष २०२०–२१ या वर्षासाठी दिलेले विद्यापीठ मान्यतेचे पत्र
क) शैक्षणिक वर्ष २०२१–२२ साठी नियुक्ती आदेश व रुजू अहवाल

४) उपरोक्त मुद्दा क्र. ३ नुसार महाविद्यालये/परिसंस्था यांनी शिक्षक मान्यता प्राप्त शिक्षकांच्या शैक्षणिक वर्ष २०२१–२२ या एका शैक्षणिक वर्षाकरीता नव्याने नियुक्ती दिलेल्या शिक्षकांच्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून दि. ३१ जुलै, २०२१ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरून या विभागात सादर करणे आवश्यक आहे. दि. ३१ जुलै, २०२१ नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर व अपूर्ण प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची संबंधित महाविद्यालये/परिसंस्थेने दखल घ्यावी.

५) तसेच ज्या पदांना विद्यापीठाची शिक्षकीय मान्यता शैक्षणिक वर्ष २०२०–२१ साठी घेतलेली नाही किंवा नव्याने भरण्यात येणाऱ्या पदांसाठी महाविद्यालयाने/संस्थेने स्थानिक निवड समितीद्वारे विहित प्रक्रियेचा अवलंब करणे बंधनकारक राहील.

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
जा. क्र. सीसीओ/ 1020
दि. 23 जून, २०२१

16/6/2021
(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक